स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

समाजकार्य विद्याशाखेतील पी.एच.डी पदवीसाठी सादर करावायाचा

संशोधन आराखडा

संशोधन विषय

लातूर जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाल कामगारांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व आरोग्याच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

संशोधक

मनोज रामचंद्र शिंदे

(एम.एस.डब्ल्यु., सेट)

मार्गदर्शक

डॉ. संजय दुर्वासराव गवई

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक पर्यवेक्षक

समाजकार्य विभाग

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

प्रस्तावना :- कृषिउत्पन्न बाजार समितीमधील वातावरण व आरोग्यः -

भारत हा कृषी प्रधान देश आहे आणि या कृषी मधुन उत्पादीत धान्य शेतातून उपभोगत्यापर्यंत पोचवण्याकरीता मध्यस्तीचे काम करणेसाठी माथाडी कामगार मुख्य घटक समजला जातो पण याच समाजातील दूर्लक्षीत घटकांचा म्हणजेच कामगार, मजूर लोकांच्या कौटुंबीक, आरोग्य सामाजिक, आर्थिक, समस्या सोडवण्यासाठी हे संशोधन कार्य विषय निवडण्याचे मुख्य प्रयोजन आहे. निवडलेला विषय “लातूर जिल्हयातील कृषीउत्पन्न बाजार समितीतील हमाल कामगारांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व आरोग्याच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास ” करणे हा असून सामाजिक, आर्थिक व आरोग्याचा कामगारांच्या जीवनावर विपरीत परिणाम घडून येत असतो. उदा.दाखल सांगवयाचे झालेच तर आर्थिक, सामाजिक, कौटुंबीक, मानसिक, इत्यादी परिणाम होत असतात. निरोगी जीवन म्हणजेच यशस्वी जीवन असे म्हणटले जाते. यांचे जीवन यशस्वी करण्यासाठी किंवा त्यांचा विकास घडवून येण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने मजूर कामगारासाठी कांही नियम केलेले आहेत. परंतू या नियमांचा प्रत्यक्षात वापर होतोच असे नाही असे भरपूर वेळेस हे आपणास पाहावयास मिळते. शासनाकडून शेती व्यवसायाठी केलेले नियम व प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी या दोन्ही बाबतीत भिन्नता दिसून येते. महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ मध्ये कृषी उत्पन्न बाजार (मार्केट यार्ड) हमाल व तोलारी (/ माथाडी) संबंधी कामकाजाच्या बाबींचा म्हणजेच नियमांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कृषी उत्पन्न बाजारामधील कार्य अतिशय कठिण तसेच आरोग्यासाठी धोकादायक आहेत. यामध्ये प्रामुख्याने शेतीमालासोबत येणारी माती धूळीच्या स्वरूपात आरोग्यास धोकादायक आहे तसेच क्षमतेपेक्षा अतिजास्त वजन उचलने, कामचा अतिरिक्त भार, व्यसन तसेच केलेल्या कामाचा मोबादला आर्थिक स्वरुपात कधी व किती मिळतो या वरुन देखील त्यांच्या आर्थिक परस्थितीचा अंदाज येतोच अतिशय कठिण अशा कामातून आरोग्याच्या समस्येला सुरुवात होते व अशा समस्येला वेळोवेळी कामगार प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या कांही कारणास्त दूर्लक्ष करित असतो त्यामुळे आरोग्याच्या समस्या गंभीर होतात व त्याचे परिणाम अतिशय धोकादायक

असण्याची शक्यता नाकरता येत नाही. सबब त्यांचे आरोग्याकडे होणारे दूर्लक्ष व हेच त्यांच्या आरोग्य देखील सामाजिक समस्या आर्थिक समस्या निर्माण होण्यास कारणीभूत ठरतात.

ओझे वाहून नेण्यासाठी शरीराचा वापर करणारा म्हणजे हमाल कामगार होय, ओझी उचलणे, चढवणे, उतरवणे, रचून ठेवणे, अशासारखी अन्य कामे करतात. शरीराचा उपयोग करुन ओझे वाहून नेणा-या कामगारास हमाल कामगार म्हणतात.

हमाल कामगार यांना योग्य वेतन आणि अटीनुसार कामाच्या अन्य सुविधा मिळत नव्हत्या. मालकांकडून त्यांना अपमानास्पद वागणूक मिळत. १९६६ मध्ये कै. माननीय आण्णा साहेब पाटील यांनी माथाडी कामगार व मुंबई मधील इतर बाजारातील त्याच्या नेत्यांना एकत्र केले. माथाडी कामगार यांनी कायद्याच्या एका भागात यावे अशी मागणी केली. खूप दिवसाच्या संघर्षा नंतर आणि समितीने दिलेल्या अहवालाचा विचार करता, महाराष्ट्र शासनाने माथाडी कामगार हे कायद्याच्या एका भागात येतील यासाठी कायदा बनविला तो नियम म्हणजचे महाराष्ट्र हमाल व इतर श्रीमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

कृषी उत्पन्न बाजार समिती तालूका जिल्हा लातूर ही महराष्ट्रातील एक नामांकित कृषि बाजार पेठ आहे. येथील व्यवहार हे केवळ महाराष्ट्रा पूरतेच मर्यादित नसून ते इतर राज्यात म्हणजेच कर्नाटक, आंध्रप्रदेश,मध्ये प्रदेश, तामिळनाडू इ. राज्यात या बाजारपेठेचा व्यवहार चालतो. हा व्यवहार प्रामुख्याने गहू, ज्वारी, तूर, उडीद, भूईमूग(शेंगदाने), चिंच, तीळ, मूग, गूळ, सोयाबीन ,सुर्यफूल ,कारळ, इ.भरपूर प्रमाणात चालतो. कोटयावधी रुपयाचे व्यवहार येथे चालतात. विविध शेतीमाल येथे येतो. परंतू या शेती मालावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया म्हणजेच चाळणी करणे, आडकण काढणे, माती काढणे, काडी कूचपट काढणे, काटाकारणे (वजन करणे) व वजन केलेले पोते व्यवस्थीत वाहनात चढवणे किंवा उतरवणे इत्यादी काम करण्यासाठी मोठया प्रमाणात हमाल व श्रमिक काम

करतात हे श्रम करीत असताना धूळीचा संबंध कामगाराशी सतत येतोच अशा परस्थितीत सुरक्षित साधनांचा उपयोग न करता श्रम करणे हे आरोग्यास धोकयाचे ठरु शकते तसेच क्षमतेपेक्षा जास्त वजन उचलने, कामाचा अतिरिक्त ताण किंवा व्यसनामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थित कामगाराना होणारे आजाराची कारणे व त्यावरील निदान/ उपाय तसेच त्यांच्या सुरक्षिततेसंबंधी काय सुविधा आहेत याबाबी महत्वाच्या आहेत. म्हणून श्रमिकांचे आरोग्य ही संकल्पना श्रमिकांच्या तसेच सामाजिक दृष्टिकोनातून महत्वाच्या आहेत कारण श्रमिकांच्या आरोग्यावरच त्यांची श्रमशक्ती अवलंबून असते व श्रमावरुन त्यांना आर्थिक मोबदला मिळत असतो या मिळालेल्या आर्थिक मोबदल्यातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. म्हणूनच श्रमिकांचे आरोग्य हे श्रमिकांसाठी त्याच्या कुटूंबासाठी, समाजासाठी महत्वाचे असते.

संशोधन पध्दती :-

सामाजिक विकासाला हातभार लावणारी संशोधन पध्दत ही एक अतिशय महत्वची पध्दती आहे. समाज विकास करण्याच्या दृष्टीने ही पध्दत सतत कार्यारत असते. म्हणून संशोधन आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले जाते. संशोधन अणि विकास या दोन्ही बाबींना समाजात एकत्र आणवयाचे असल्यास त्यांना प्रशिक्षण किंवा योग्य शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. म्हणजेच विकास, संशोधन शिक्षण हे एकमेकापासून वेगळे असले तरी परस्परावलंबी आहेत.

समाजामध्ये सतत विविध प्रकारच्या घटना घडत असतात. अनेक प्रकारच्या वेगवेळया समस्यांना लोकांना सामोरे जावे लागते. या सर्व उद्भवण-या घटना, समस्याचे स्वरुप स्पष्ट होण्यासाठी त्यांच्या निराकरणासाठी सामाजिक संशोधन महत्वाचे आहे. सामाजिक घटनाचा अभ्यास

समाज सुधारणा व समाज प्रगती यासाठी अत्यंत उपयुक्त असतो. सत्यसंशोधनामुळे ज्ञानप्राप्ती होते. संशोधनामुळे समाजात वाईट गोष्टीची व त्याच्या दुष्टपरिणामांची जाणीव होते.

सामाजिक संशोधन ही एक पध्दतशीर व वैज्ञानिक प्रक्रिया असून त्या प्रक्रियेद्वारे सामाजिक जीवनासंबंधी नविन तथ्यांचा शोध घेतला जातो किंवा विद्यमान तथ्यांची व्याप्ती वाढविली जाते अथवा जुन्या तथ्यांचे पुर्नस्पष्टीकरण केले जाते. त्याप्रमाणे सामाजिक घटनांची कारणे व त्याचा परिणाम यांचा शोध घेतला जातो.

अभ्यास विषयाची निवडः-

कृषी उत्पन्न बाजार समिती जिल्हा लातूर ही महराष्ट्रातील एक नामांकित कृषी बाजार पेठ आहे. येथील व्यवहार हे केवळ महाराष्ट्रा पूरतेच मर्यादित नसून ते इतर राज्यात म्हणजेच कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्ये प्रदेश, तामिळनाडू, गुजरात इ.राज्यात या बाजारपेठेचा व्यवहार चालतो. हा व्यवहार प्रामुख्याने गहू, ज्वारी, तूर, उडीद, भूईमूग (शेंगदाने), चिंच, तीळ, मूग, गूळ, सोयाबीन ,सुर्यफूल ,कारळ, इ.भरपूर प्रमाणात चालतो. कोटयावधी रुपयाचे व्यवहार येथे चालतात. विविध शेतीमाल येथे येतो. परंतू या शेती मालावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया म्हणजेच चाळणी करणे, आडकण काढणे, माती काढणे, काडी कूचपट काढणे, काटा करणे (वजन करणे) व वजन केलेले पोते व्यवस्थीत वाहनात चढवणे किंवा उतरवणे इत्यादी काम करण्यासाठी मोठया प्रमाणात हमाल व श्रमिक काम करतात हे श्रम करीत असताना धूळीचा संबंध कामगाराशी सतत येतोच अशा परस्थित सुरक्षित साधनांचा उपयोग न करता श्रम करणे हे आरोग्यास धोकयाचे ठरु शकते तसेच क्षमतेपेक्षा जास्त वजन उचलने, कामाचा अतिरिक्त ताण किंवा व्यसनामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत कामगारांना होणारे आजाराची कारणे व त्यावरील निदान / उपाय तसेच त्यांच्या सुरक्षिततेसंबंधी काय सुविधा आहेत याबाबी महत्वाच्या आहेत. त्याचबरोबर दुय्यम सामाजिक दर्जा,

निरक्षरता, गरीबीची परिस्थिती सरकारी योजनांची माहिती नसणे आणि आरोग्याचा कनिष्ठ दर्जा इ.कारणामुळे श्रमिक वर्गमागासलेला आहे म्हणून श्रमिकांचे आरोग्य ही संकल्पना श्रमिकांच्या तसेच सामाजिक दृष्टिकोनातून महत्वाच्या आहेत कारण श्रमिकांच्या आरोग्यावरच त्यांची श्रमशक्ती अवलंबून असते व श्रमावरुन त्यांना आर्थिक मोबदला मिळत असतो या मिळालेल्या आर्थिक मोबदल्यातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. म्हणूनच श्रमिकांचे आरोग्य हे श्रमिकांसाठी तसेच त्याच्या कुटुंबासाठी, आर्थिक स्थिती ही समाजासाठी महत्वाचे असते. म्हणून वरील विषय मी स्वंयस्फूर्तपणे निवडला आहे.

विषय निवडीचा हेतूः -

हमाल श्रमिक हे या बाजार समितीचे मुख्य घटक आहेतच तसेच ते एक प्रकारे सामाजिक घटक देखील आहेत त्यांची जीवन पध्दती ही सध्याच्या युगाचा विचार करता अत्यंत निकृष्ठ दिसते. नावाजलेल्या या बाजार समितीमध्ये मात्र हमाल यांच्या अत्यंत दूरदशा झालेली पाहण्यास मिळते. तेथिल कामकरण्याची स्थिती, निकृष्ठ राहणीमान, गरिबी, आरोग्याची परिस्थिती तसेच कौटुंबीक अडचणी इत्यादी समस्या मानवी विकासात अडथळा बनत आहेत. कारण हमाल व यांचे आरोग्य आणि यांना देण्यात येणा-या सुविधा अत्यंत तुटपूंज्या आहेत तसेच आरोग्य विषय त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी व त्यांच्या आरोग्यावर कोणते घटक परिणाम करतात हे अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडण्याचा हेतू आहे. हमाल श्रमिकांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक, आरोग्य व आर्थिक समस्याचा व त्या निवारणासाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टिने हे संशोधन महत्वाचे आहे.

अभ्यासाचे गृहितके :-

१) हमाल यांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

२) अतिश्रमाचा व ज्या स्थितीत मध्ये ते श्रम करतात त्या स्थितीचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

३) हमाल यांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम त्यांच्या कौंटुबिक व सामाजिक जीवनावर झालेला दिसून येतो.

४) हमाल शारीरिक थकवा दूर करणेसाठी दारु, तंबाखू, सिगारेट सारखी व्यसन करतात.

५) केंद्र व राज्य सरकार कडून हा श्रमिकवर्ग नेहमी दुर्लक्षित राहिला आहे.

०६) हमाल कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती खालवण्यासाठी शासनाची उदासीनता हे महत्त्वाचे कारण दिसुन येते.

०७) हमाल कामागार बाबत समाजाचा दृष्टिकोण पक्षपाती असल्याचे दिसुन येते.

अभ्यासाचा उद्दिष्टे:-

१) लातूर जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीची रचना, कार्य, पध्दती याचा अभ्यास करणे

२) लातूर जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाल श्रमिकांच्या सामाजिक कौटुबीक व आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) हमाल यांना देण्यात येणा-या सोयी सुविधांची माहिती जाणून घेणे.

४) हमाल यांच्या आर्थिक स्थितीचा सामाजिक जीवनावर व आरोग्यावर होणा-या परिणामांचा चिकित्सक अभ्यास करणे.

५) अतिश्रमामुळे होणा-या आजार व व्यसन याची आरोग्यावर होणा-या परिणामांची कारणमिमांसा करणे.

६) हमालामध्ये कौटुबीक, सामाजिक, आरोग्य सुधारणा करण्या करीता असलेल्या शासकीय योजनांची माहिती अभ्यासणे.

अभ्यास क्षेत्रः -

अभ्यास विषयाची निवड ही लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या हे संशोधन अभ्यासाचे क्षेत्र निवडले आहे.

नमुना निवडः-

प्रस्तुत अभ्यास विषया संबंधी नमुना निवडताना असे ठरविण्यात आले कि लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यामधील २०० निवेदकांची निवड करावायाची आहे आणि या निवेदकांची निवड साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात येईल. या अभ्यास विषयासंबंधीत असलेली तथ्ये गोळा करण्यासाठी व महिती गोळा करण्यासाठी बाजार समिती मधीले काम करणा-या हमाल कामगार यांच्या कडून माहिती संकलीत करण्यात येईल.

तथ्य संकलन पध्दतीः -

कोणत्याही संशोधनात अभ्यास विषयाची निवड झाल्यानंतर अभ्यास विषयाची तथ्ये गोळा करावी लागतात. या तथ्यांची आधार अभ्यास विषयाचा निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ होण्यासाठी महत्वाचा ठरतो. त्यासाठी मूलाखतीद्वारे सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक तंत्रः-

अभ्यास विषयाच्या अनुषंगाने कोणती माहिती कशा प्रकारे मिळवायची हा हेतू डोळयासमोर घेवून संशोधक कामकाजाची आखणी करीत असतो. हेतूला अनुरुप कोणकोणती सामुग्री आवश्यक आहे. ती संशोधक मिळवित असतो सर्व साधारणपणे संशोधक निवेदकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून जी माहिती मिळवितो ती माहिती प्राथमिक म्हणून ओळखली जाते.

अ) मुलाखत अनुसूचीः -

सदर संशोधन अहवाल तयार करण्यासाठी संशोधकाने प्रथम मुलाखत अनुसूची तयार करण्याचे निश्चित केले आणि संशोधन क्षेत्रात जाऊन संबंधित व्यक्तिशी प्रत्यक्ष भेटून मुलाखत अनुसूचीद्वारे मुलाखती घेऊन आवश्यक ते तथ्य संकलन करणे.

ब) निरीक्षणः-

संशोधनाकरिता मुलाखत अनुसूची वापरताना निरीक्षण हे तंत्र देखील उपयोगात आणण्याचे निश्चित करण्यात आले आहे. निरीक्षणाच्या माध्यमातून प्रत्यक्षात उत्तरदाते उत्तर देतेवेळी त्यांच्या हावभावांचे, उत्तर देण्याचा पध्दतीचे व त्यावेळची त्यांची मनस्थिती इ. चे निरिक्षण करणे आहे.

क) चर्चाः -

सदर संशोधन कार्य करण्यासाठी कृषिउत्पन्न बाजार समितीमधील हमाल यांच्याशी चर्चा करुन माहिती मिळवण्याचे निश्चित केले आहे तसेच तेथे सद्यपरिस्थिती मध्ये असलेल्या त्यांच्या समस्या कामगारांशी चर्चा करुन माहिती मिळवणे.

द्वितीय सामुग्री मिळवण्याचे साधनेः -

द्वितीय स्त्रोतामध्ये संशोधकाने संदर्भ ग्रंथ, अहवाल, वर्तमानत्रे, ग्रंथालयीन साधने यांचा समावेश केलेला आहे. कोणत्याही विषयावर संशोधन करताना त्याविषयासंबंधी प्रकाशित साहित्याचा अभ्यास संशोधकाने करणे आवश्यक असते. या दृष्टीने सदर विषयाच्या अभ्यासासाठी संशोधकाने हमाल व यांच्याशी संबंधीत पुस्तकाचा वापर केलेला आहे.

संशोधन कालावधी : -

सदरील संशोधनाचा कालावधी हा इ. स. २०१९ ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधन अध्ययन करण्यात येणारे आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रकरण पाहिले :- **प्रस्तावना**

प्रकरण दुसरे :- **साहित्याचा आढावा**

प्रकरण तिसरे :- **संशोधन पध्दती**

प्रकरण चौथे :- **तथ्य विश्लेषण व निर्वाचन**

प्रकरण पाचवे :- **व्यष्टी अध्ययन**

प्रकरण सहावे :- **निष्कर्ष, सारांश आणि शिफारशी**

. **परिशिष्टे :-** अ. संदर्भग्रंथ सुची,

ब. मुलाखत - अनुसूची,

क. प्रश्नावली,

ड. छायचित्रे व दैनिकामधील कात्रणे.

संदर्भग्रंथ सुची :-

१. रा.ना. घाटोळे २००९-२०१०-समाजशास्त्रीय संशोधन पध्दती व तत्वे, मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती.

२. सौ. शोभादेवी क्षीरसागर २०१७-सरकारी कामगार अधिकारी, के सागर पब्लिकेशन्स पुणे तिसरी आवृत्ती.

३. संशोधन पध्दती १९८१ - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, प्रा.पु.ल.भांडारकर

४. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

५. कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७.

संशोधक

मनोज रामचंद्र शिंदे
(एम.एस.डब्ल्यु., सेट)

मार्गदर्शक

डॉ. संजय दुर्वासराव गवई
सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक पर्यवेक्षक
समाजकार्य विभाग
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर